शपथेवर पुढील उलट–तपास श्री गिरडकर विधीज्ञ मार्फत गैरअर्जदारातर्फे :–

हे म्हणणे खरे आहे की मी दि.१६.१२.२०१८ ते ३१.०१.२०१९ पर्यंत वैद्यकिय रजेवर होती. हे म्हणणे खरे आहे की त्यानंतर मी दि.०१.०२.२०१९ रोजी कामावर रूजु होण्याकरीता अगंणवाडीला गेली होती त्यावेळेस तेथे लोकं जमलेले होती. हे म्हणणे खरे आहे की त्यावेळेस लोकांनी मला विरोध केला. हे म्हणणे खरे आहे की गावातील लोकांनी माझया विरूध्द तक्रारी दाखल केल्या. हे म्हणणे खरे नाही की ग्राम पंचायत ने मला रूजु न होण्यासाठी ठराव पारीत केला. हे म्हणणे खरे आहे की गैरअर्जदार क्र.१ व २ यांनी चौकशी घेतली होती व त्यामध्ये गैरअर्जदार यांनी मला खुलासा मागीतला व तो मी दिला. हे म्हणणे खरे आहे की चौकशी अहवाल आल्यानतर मला सेवेतुन त्यांनी कमी केले. हे म्हणणे खरे नाही की मी जेव्हा कामावर होती त्यावेळेस लोकांच्या तक्रारी येत होत्या. हे म्हणणे खरे आहे की माझया वैद्यकिय रजेच्या वेळेस मला विष बाधा दि.१४.१२.२०१८ रोजी झालेली होती. हे म्हणणे खरे आहे की माझी प्रकृती चांगली नसतांनाही मी कामावर हजर होती. हे म्हणणे खरे आहे की ज्या दिवशी मला विष बाधा झाली त्यावेळेस मी कामावर होती. हे म्हणणे खरे नाही की मी अंगणवाडी मध्ये कामावर असतांना विष प्राशन केले होते. हे म्हणणे खरे आहे की त्या दिवशी अगंणवाडीतील मुले अंगणाडी मध्ये आलेले होते. ग्राम पंचायतने ने मला ठराव पारीत करतांना बोलाविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की मी अंगणवाडी मध्ये रूजु झाल्यास अगंणवाडीमध्ये गावातील मुले गावकरी पाठवणार नाही असे गावकरी म्हणत होते. हे म्हणणे खरे आहे की गैरअर्जदार यांनी मला दि. ०६.०३.२०१९ ला वैद्यकिय प्रमाणपत्र आणण्यास सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की त्यानुसार मी डॉ. मेश्राम यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर केले होते. हे म्हणणे खरे आहे की मी सदर प्रमाणपत्र गैरअर्जदाराला दिले होते. अर्जदार यांचे अधिवक्ता यांनी सदर वैद्यकिय प्रमाणपत्र रेकॉर्डला दाखल असुन त्यास निशाणी देण्यास विनंती केली. परंतु गैरअर्जदार यांचे अधिवक्ता

–१०–

यांनी त्यास आक्षेप नोंदविला. सदर वैद्यकिय प्रमाणपत्र रेकॉर्डवर दाखल केले असल्याबाबत प्रश्न विचारला नसल्यामुळे व अर्जदाराने उलट तपासामध्ये सदर वैद्यकिय प्रमाणपत्र रेकॉर्डवर दाखल असल्याबाबत नमुद न केल्यामुळे त्यास निशाणी देण्यात येत नाही.

हे म्हणणे खरे आहे की मला लोकांच्या तक्रारीबाबत खुलासा मागण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की मी जेव्हा अंणवाडीमध्ये कामावर जात होती त्यावेळेस अंगणाडीमध्ये कमी मुले येत होती व अंणवाडीमध्ये मुलेच येत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की मी अंणवाडीमध्ये कार्यरत असतांना माझी कर्तच्य योग्य पध्दतीने बजावत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की मी अंणवाडीमध्ये विष प्राषन केले होते व त्यामुळे गावकरी अगंणच्व्ज्ञीमध्येमूल पाठवित नव्हती. हे म्हणणे खरे नाही की मी वरिष्ठांचया आदेशाचे पालन करीत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे शपथपत्र दाखल केले असुन मी आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की मला माझया उदरनिर्वाह करण्याकरीता मला दुसरीकडे काम करावे लागते.

माझे समक्ष

(श्रीमती रू.वि. मेटे)

न्यायाधीश

कामगार न्यायालय, चंद्रपुर

चंद्रपुर.

दि.१७.०२.२०२२.